## विशेष दिवाणी दावा क्र.६५/२०२३ मधील निशाण क्र.२० खालील आदेश

[ CNR No.MHKO090005502023 ]

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांनी विना–कैफियतचा आदेश रद्द करणेत यावा याकरिता सादर केला आहे. प्रतिवादींचे थोडक्यात असे कथन आहे की, प्रतिवादींनी प्रस्तुतचा दावा चालणेस योग्य नाही म्हणून दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ प्रमाणे अर्ज सादर केला होता. सदरील अर्ज नामंजूर करणेत आला. प्रस्तूत कामी कैफियत देणे गरजेचे होते. तथापि, प्रतिवादी ही शैक्षणिक संस्था असून शैक्षणिक संस्थेच्या दैनंदिन कामकाजामध्ये योग्य ती कागदपत्रे व माहिती वेळेत प्राप्त होवू शकली नाही. त्यामुळे कैफियत दाखल करणेस विलंब झाला आहे. तरी प्रतिवादी विरुध्द झालेला विना–कैफियतचा आदेश रद्द करणेत यावा.

२. प्रस्तुतच्या अर्जास वादीमार्फत तीव्र आक्षेप नोंदविण्यात आला. वादी यांनी असे कथन केले की, दि.१३.०२.२०२४ रोजी विना–कैफियतचा आदेश पारीत करणेत आला आहे. दोन्ही पक्ष सन २०१७ पासून वेगवेगळ्या ठिकाणी कायदेशीर खटले चालवित आहेत. त्यामुळे त्यांना प्रकरणाबाबत पुर्ण माहिती आहे. तसेच नेमके कुठले दस्त त्यांना प्राप्त झाले नाहीत याबद्दल त्यांनी आपल्या अर्जात काही नमूद केलेले नाही. प्रतिवादींनी दि.२८.११.२०२३, ०९.०१.२०२४ व १३.०२.२०२४ रोजी एकच कारण नमूद करुन अर्ज दिला आहे. यावरून प्रतिवादी प्रकरण चालविणेत सजग नाही, असे दिसते. प्रतिवादी केवळ विलंब करणेच्या दृष्टीने जाणीवपुर्वक न्यायालयीन प्रक्रियेची थट्टा करीत आहेत. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करणेत यावा.

३. प्रकरणाचे अवलोकन केले. दोन्ही पक्षाचे कथन ऐकण्यात आले. मान्यत: प्रकरणात जबाब दाखल करणेस विलंब झाला आहे. तसेच प्रतिवादीविरुध्द दि.१३.०२.२०२४ रोजी विना–म्हणणेचा आदेश पारीत करणेत आला आहे. तथापि, प्रस्तुतच्या प्रकरणात दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ प्रमाणे दरम्यानच्या काळात कार्यवाही करणेत आली होती, ही बाब देखील नाकारता येणार नाही. दोन्ही पक्षांमध्ये सन २०१५ पासून वाद सुरू आहे. त्यामुळे अशा परिस्थितीत, प्रतिवादीस त्यांची बाजू मांडणेस योग्य ती संधी देणे क्रमप्राप्त वाटते. झालेल्या विलंबास योग्य तो दंड आकारलेस न्यायसंगत ठरेल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे :–

## **आदेश**

१) प्रस्तुतचा अर्ज रक्कम रु.१०००/– (अक्षरी रक्कम रुपये एक हजार मात्र) इतक्या खर्चावर मंजूर करण्यात येतो. खर्चाची रक्कम वादी यांना अदा करणेत यावी.

२) खर्चाची रक्कम अदा झालेनंतर प्रतिवादी यांचेविरुध्द झालेला विना–कैफियतचा आदेश रद्द करणेत येत असून त्यांची कैफियत स्विकारणेत येत आहे.

Digitally signed by NARENDRA
Date: 2025.02.28 17:40:09 +0530

स्थळ : गडहिंग्लज.
दिनांक : २८.०२.२०२५.

( न. श्री. पुरी )
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
गडहिंग्लज